Adda247 GET IT ON Google Play

MPSC Group C Question Paper Held on 11 Jan 2026

**2025**

**P21**

| प्रश्नपुस्तिका क्रमांक BOOKLET NO. |
|---|
| 239408 |

संच क्र. **D**

## प्रश्नपुस्तिका
## सामान्य क्षमता चाचणी

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

वेळ : 1 (एक) तास

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

### ताकीद

**ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षा कक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी, प्राधिकृत केलेली, नेमलेली किंवा कर्तव्ये सोपविलेली कोणतीही व्यक्ती, प्रश्नपुस्तिका उघडण्यासाठी व वितरित करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी अशी प्रश्नपुस्तिका किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिची प्रत उघडणार नाही, फोडणार नाही किंवा ताब्यात घेणार नाही किंवा पाहणार नाही किंवा सोडविणार नाही किंवा सोडविण्यास सहाय्य करणार नाही; असे केल्यास "महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गांस प्रतिबंध) अधिनियम – २०२४" मधील तरतुदीनुसार सदर व्यक्ती तीन वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, जी पाच वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा आणि दहा लाख रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडास पात्र होईल. तसेच ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**


Adda247
Test Prime
ALL EXAMS, ONE SUBSCRIPTION
1,00,000+ Mock Tests
Personalised Report Card
Unlimited Re-Attempt
600+ Exam Covered
25,000+ Previous Year Papers
500% Refund
IBPS
NABARD
ATTEMPT FREE MOCK NOW

Adda247 GET IT ON Google Play



1. 1919 च्या कायद्यातील त्रुटींची चौकशी करण्यासाठी कोणती कमिटी नियुक्त केली होती ?

अ. मुडीमन कमिटी

ब. सायमन कमिटी

क. लॉर्ड मेकॉले कमिटी

ड. हंटर कमिटी

(1) फक्त अ (2) फक्त ब

(3) फक्त ब आणि क (4) फक्त क आणि ड

Which Committee was appointed for inquiry into the defects of the Act of 1919 ?

a. Mudiman Committee

b. Simon Committee

c. Lord Macaulay Committee

d. Hunter Committee

(1) Only a (2) Only b

(3) Only b and c (4) Only c and d

2. लॉर्ड हार्डिंग (1844 – 48) यांच्या काळात कोणते पहिले युद्ध झाले ?

(1) इंग्रज – मराठा युद्ध

(2) इंग्रज – शिख युद्ध

(3) इंग्रज – अफगाण युद्ध

(4) इंग्रज – मुघल युद्ध

Which was the first war fought during the time of Lord Hardinge (1844 – 48) ?

(1) Anglo – Maratha War

(2) Anglo – Sikh War

(3) Anglo – Afghan War

(4) Anglo – Mughal War



Adda247

Adda247 GET IT ON Google Play



3. कायमधारा महसूल पद्धतीत कोणत्या वर्गाला अधिक फायदा झाला ?

अ. शेतकरी

ब. जमीनदार

क. कारखानदार

ड. कारागीर

(1) फक्त 'अ' आणि 'ब' (2) फक्त 'क' आणि 'ड'

(3) फक्त 'अ' (4) फक्त 'ब'

In the permanent settlement system, which class benefitted the most ?

a. Farmers

b. Zamindars (Landlords)

c. Industrialists

d. Artisans

(1) Only 'a' and 'b' (2) Only 'c' and 'd'

(3) Only 'a' (4) Only 'b'

---

4. खालीलपैकी कोणत्या वृत्तपत्र आणि साहित्याशी लाला लजपतराय यांचा संबंध नाही ?

अ. त्यांनी 'पंजाबी' हे वृत्तपत्र प्रकाशित केले.

ब. त्यांनी 'यंग इंडिया' या ग्रंथाचे लेखन केले.

क. 'वंदे मातरम' या वृत्तपत्रातून त्यांनी 'पॅसिव्ह रेझिस्टन्स थेअरी' चा सिद्धांत मांडला.

ड. 'पॉलटिकल फ्यूचर ऑफ इंडिया' या ग्रंथाचे त्यांनी लेखन केले.

(1) केवळ 'अ' आणि 'ब' (2) केवळ 'क'

(3) केवळ 'क' आणि 'ड' (4) केवळ 'ब'

Which of the following Newspaper and Literature is not associated with Lala Lajpat Rai ?

A. He published the Newspaper 'Punjabi'.

B. He wrote the book 'Young India'.

C. He formulated the 'Theory of Passive Resistance' in Newspaper 'Vande Mataram'.

D. He wrote the book 'Political Future of India'.

(1) Only 'A' and 'B' (2) Only 'C'

(3) Only 'C' and 'D' (4) Only 'B'

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Adda247 GET IT ON Google Play



**5.** खालील वर्णनावरून समाज सुधारकाला ओळखा.

अ. त्यांनी 'ज्ञान प्रकाश' हे मराठी वृत्तपत्र काढले.

ब. सरकारने त्यांचा 'जस्टिस ऑफ पीस व राव बहादूर' या पदव्या देऊन गौरव केला.

क. त्यांना संगीत विषयाची आवड होती.

(1) बाबा पद्मनजी (2) गोपाळ हरी देशमुख

(3) विष्णुशास्त्री पंडित (4) वरीलपैकी कोणतेही नाही

Identify the social reformer from the following description.

a. He started the Marathi newspaper 'Dnyan Prakash'.

b. The government honored him with the titles 'Justice of Peace and Rao Bahadur'.

c. He had a deep interest in music.

(1) Baba Padmanji (2) Gopal Hari Deshmukh

(3) Vishnushastri Pandit (4) None of the above

---

**6.** खालील विधाने वाचून कोणत्या स्त्री सुधारकाच्या कार्याची ओळख होते ?

अ. 'शारदासदन' आणि 'आर्य महिला समाज' या संस्थेच्या स्त्री उद्धाराच्या कार्यात त्या सक्रिय होत्या.

ब. इ. स. 1913 मध्ये समाजसेवेच्या कार्यासाठी त्यांचा सरकारने 'कैसर-ए-हिंद' या पदवीने सन्मान केला.

क. इ. स. 1894 साली त्यांनी 'हिंदु लेडिज सोशल क्लब' ची स्थापना केली.

ड. ठाकरसी, टाटा या कुटुंबियांनी त्यांच्या स्त्री उद्धाराच्या कार्याला आर्थिक पाठबळ दिले.

(1) हिंदु लेडी डॉ. रखमाबाई (2) पंडिता रमाबाई

(3) रमाबाई रानडे (4) डॉ. आनंदीबाई जोशी

Which women reformer's work do you identify by reading the following statements ?

A. She was active in the women's emancipation work of the organization 'Shardasadan' and 'Arya Mahila Samaj'.

B. The Government honored her with the title of 'Kaisar-i-Hind' for her social work in 1913.

C. She founded the 'Hindu Ladies Social Club' in 1894.

D. Her work for the emancipation of women was supported by Thakarsy and Tata families by providing financial assistance.

(1) Hindu lady Dr. Rakhamabai (2) Pandita Ramabai

(3) Ramabai Ranade (4) Dr. Anandibai Joshi

Adda247 GET IT ON Google Play



**7.** सन 1915 मध्ये म. गांधीजी भारतात आल्यानंतर पुढीलपैकी कोणते प्रश्न त्यांनी यशस्वीपणे हाताळले ?

अ. बिहार मधील चंपारण्यातील निळीचा प्रश्न.

ब. खेडा येथील शेतकऱ्यांचा शेतसारा प्रश्न.

क. अहमदाबाद शहरातील मील मजूर आणि मालक यांच्यातील संघर्ष.

ड. मुस्लीमासाठी स्वतंत्र मतदार संघाची निर्मिती करणे.

(1) 'अ', 'ब' आणि 'क'  (2) 'अ', 'क' आणि 'ड'

(3) 'ब', 'ड' आणि 'अ'  (4) 'अ', 'ब', 'क' आणि 'ड'

After M. Gandhiji came to India in 1915, which of the following problems did he handle successfully ?

a. The indigo problem of Champaran in Bihar.

b. The land revenue problem of the farmers of Kheda.

c. The conflict between the mill workers and the owners in Ahmedabad city.

d. Creating a separate electorate for Muslims.

(1) 'a', 'b' and 'c'  (2) 'a', 'c' and 'd'

(3) 'b', 'd' and 'a'  (4) 'a', 'b' 'c' and 'd'

---

**8.** 3 सप्टेंबर 1942 रोजी तासगाव मामलेदार कचेरीवरील मोर्चाचे खालीलपैकी कोणत्या कार्यकर्त्यांनी नेतृत्व केले होते ?

अ. कृष्णा रामा कुऱ्हाडे

ब. वि. स. पागे

क. गोविंद खोत

ड. डॉ. य. कृ. सोवनी

(1) फक्त अ आणि ब  (2) फक्त ब आणि क

(3) फक्त ब, क आणि ड  (4) वरील सर्व बरोबर

Which of the following activists led the March to the Mamledar Court of Tasgaon on 3rd September 1942 ?

a. Krishna Rama Kurhade

b. V. S. Page

c. Govind Khot

d. Dr. Y. K. Sovani

(1) Only a and b  (2) Only b and c

(3) Only b, c and d  (4) All of the above are correct

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Adda247

Adda247 GET IT ON Google Play



9. महाराष्ट्रातील 1857 च्या उठावा संदर्भातील खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

अ. साताऱ्चे छत्रपती प्रतापसिंह यांचे गेलेले राज्य परत मिळविण्यासाठी रंगराव पागे यांनी अविरत प्रयत्न केले.

ब. कोल्हापूरात 31 जुलै 1857 रोजी 21 व्या व 28 व्या तुकडीतील शिपायांनी बंड केले.

क. नरगुंदच्या भावे या संस्थानिकांचा दत्तकपुत्र अमान्य झाल्याने मे 1858 मध्ये त्यांनी बंड केले.

ड. 11 एप्रिल 1858 रोजी आंबा पाणीचे लढाईत भिल्लांचा पराभव झाला.

(1) फक्त अ आणि ब

(2) फक्त क आणि ड

(3) फक्त अ, ब आणि क

(4) फक्त ब, क आणि ड

Which of the following statements are correct regarding the uprising of 1857 in Maharashtra ?

a. Rangrao Page made relentless efforts to regain the lost kingdom of Chhatrapati Pratapsingh of Satara.

b. Soldiers of the 21st and 28th regiments mutinied in Kolhapur on 31st July 1857.

c. In Princely State of Nargunda, Bhave's adopted son was disowned and he rebelled in May 1858.

d. The Bhillas were defeated in the battle of Amba Pani on 11th April 1858.

(1) Only a and b

(2) Only c and d

(3) Only a, b and c

(4) Only b, c and d

Adda247 GET IT ON Google Play



10. जोड्या लावा :

| | राष्ट्रीय काँग्रेसची अधिवेशने व ठिकाण | | अध्यक्ष |
|---|---|---|---|
| अ. | काँग्रेसचे दुसरे अधिवेशन 1886 - कलकत्ता | I. | बद्रुद्दिन तय्यबजी |
| ब. | काँग्रेसचे तिसरे अधिवेशन 1887 - मद्रास | II. | विल्यम वेडरबर्न |
| क. | काँग्रेसचे चौथे अधिवेशन 1888 - अलाहाबाद | III. | दादाभाई नौरोजी |
| ड. | काँग्रेसचे पाचवे अधिवेशन 1889 - मुंबई | IV. | जॉर्ज युल |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | III | I | IV | II |
| (2) | II | III | I | IV |
| (3) | IV | II | III | I |
| (4) | I | IV | II | III |

Match the pairs :

| | National Congress Sessions and Venue | | Chairman |
|---|---|---|---|
| a. | Second Session of Congress 1886 – Calcutta | I. | Badruddin Tyabji |
| b. | Third Session of Congress 1887 – Madras | II. | William Wedderburn |
| c. | Fourth Session of Congress 1888 – Alahabad | III. | Dadabhai Naoroji |
| d. | Fifth Session of Congress 1889 – Mumbai | IV. | George Yule |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | III | I | IV | II |
| (2) | II | III | I | IV |
| (3) | IV | II | III | I |
| (4) | I | IV | II | III |

11. थंड हवेचे ठिकाण आणि जिल्हा या संदर्भात खालीलपैकी चुकीचे विधान कोणते ?

(1) पाल–जळगाव
(2) तोरणमाळ–धुळे
(3) महाबळेश्वर–सातारा
(4) लोणावळा–पुणे

Which of the following is a wrong statement regarding the hill station and district ?

(1) Pal–Jalgaon
(2) Toranmal–Dhule
(3) Mahabaleshwar–Satara
(4) Lonavala–Pune

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Adda247 GET IT ON Google Play



12. खालील विधानांमधून चुकीचे विधान ओळखा.

(1) वर्धा व वैनगंगा या नद्यांचा संगम चंद्रपूर च्या नैऋत्येस आहे.

(2) कान्हा, पेंच, बाग या वैनगंगा नदीच्या उपनद्या आहेत.

(3) वैनगंगा नदीच्या डाव्या तीरावर पूस, आरणा, वाघाडी आणि खुळी या उपनद्या येऊन मिळतात.

(4) तावरजा, तोरणा, मन्याड, गिरणा इत्यादी मांजरा नदीच्या उपनद्या गोदावरीस येऊन मिळतात.

Identify the incorrect statement from the following statements.

(1) The confluence of the rivers Wardha and Wainganga occurs southwest of Chandrapur.

(2) Kanha, Pench, Bag are tributaries of the Wainganga river.

(3) Tributaries like Poos, Arana, Waghadi and Khuli joins on the left bank of the Wainganga river.

(4) The tributaries of Manjara river i.e. Tavarja, Torna, Manyad, Girna etc. joins the Godavari.

---

13. कोपेन यांनी केलेल्या हवामान वर्गीकरण विभागानुसार भारताच्या पश्चिम किनारी प्रदेशात कोणत्या प्रकारचे हवामान आढळते ? (मुंबईच्या दक्षिणेकडे)

(1) Aw (उष्णकटिबंधीय सव्हाना प्रकार)

(2) As (कोरड्या उन्हाळ्यासह मान्सूनचा प्रकार)

(3) Amw (कमी कोरड्या हिवाळ्यासह मान्सून प्रकार)

(4) BShw (अर्ध-शुष्क स्टेपी प्रकार)

According to Koppen's classification of the climatic regions, which type of climate is found in the western coastal region of India ? (South of Mumbai).

(1) Aw (Tropical Savanah type)

(2) As (Monsoon type with dry summer)

(3) Amw (Monsoon type with short dry winter)

(4) BShw (Semi-arid Steppe type)

Adda247 GET IT ON Google Play



**14.** खालील विधानापैकी चुकीचे/ची विधान/ने कोणती/ते आहे/त ?

अ. उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आणि मणिपुर ही भारतातील राज्ये नेपाळी सीमेला लागून आहेत.

ब. नेपाळ हा एक भूपरिवेष्टित देश आहे, जो चीन आणि भारत या दोन महाकाय देशामध्ये वसलेला आहे.

क. भूतान हा देश नेपाळ या देशाचा शेजारी आहे.

(1) अ आणि ब (2) ब आणि क (3) क आणि अ (4) फक्त क

Which of the following statement/s is/are incorrect ?

a. Uttarakhand, Uttar Pradesh, Bihar, West Bengal and Manipur States of India shares a border with Nepal.

b. Nepal is a landlocked country which is situated between two giant countries i.e. China and India.

c. Bhutan is a neighboring country of Nepal.

(1) a and b (2) b and c (3) c and a (4) Only c

---

**15.** योग्य जोड्या जुळवा.

| | **खनिजे** | | **उत्खनन क्षेत्र** |
|---|---|---|---|
| अ. | मँगनिज | i. | सुरजागड |
| ब. | लोहखनिज | ii. | जानोली |
| क. | बॉक्साईट | iii. | चिखला |
| ड. | क्रोमाईट | iv. | उदगिरी |

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | iv | ii | i |
| (2) | i | ii | iv | iii |
| (3) | iii | i | iv | ii |
| (4) | iii | i | ii | iv |

Match the following.

| | **Minerals** | | **Mining Area** |
|---|---|---|---|
| a. | Manganese | i. | Surjagad |
| b. | Iron ore | ii. | Janoli |
| c. | Bauxite | iii. | Chikhala |
| d. | Chromite | iv. | Udgiri |

| | **a** | **b** | **c** | **d** |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | iv | ii | i |
| (2) | i | ii | iv | iii |
| (3) | iii | i | iv | ii |
| (4) | iii | i | ii | iv |

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Adda247
GET IT ON Google Play



16. खालीलपैकी कोणते प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना, 2025 चे उद्दिष्ट नाही ?

अ. मासेमाराची सामाजिक, भौतिक व आर्थिक सुरक्षा.

ब. मासेमाराचे उत्पन्न चारपटीने वाढवणे.

क. शाश्वत पद्धतीने मत्स्य व्यवसायाच्या क्षमतेचा वापर.

ड. मासे उत्पादन आणि उत्पादकता वाढवणे.

(1) सर्वच प्रमुख उद्दिष्टे आहेत

(2) फक्त अ, क आणि ड उद्दिष्ट आहेत, ब उद्दिष्ट नाही

(3) फक्त अ आणि ब उद्दिष्टांत नाहीत

(4) फक्त क आणि ड उद्दिष्टांत नाहीत

Which of the following is not an objective of Pradhan Mantri Matsya Sampada Yojana, 2025 ?

A. Social, Physical and Economic Security of Fisherman.

B. Fourfold increase in the Fisherman's income.

C. Harnessing of fisheries potential in sustainable manner.

D. Enhancing fish production and productivity.

(1) All are the major objectives

(2) Only A, C and D are the objectives, B is not in objectives

(3) Only A and B are not in objectives

(4) Only C and D are not in objectives

---

17. भारतामध्ये प्रथम क्लोन (कृतक) पद्धतीने जन्मलेले गिर गाईच्या वासराचे नाव ________ होते.

(1) कपीला (2) सरस्वती

(3) लूनी (4) गंगा

India's first cloned cow calf of the Gir breed was named as ________.

(1) Kapila (2) Saraswati

(3) Luni (4) Ganga

---

18. संयुक्त राष्ट्रसंघाच्या जागतिक कार्यसूची आराखडा 2015 नुसार शाश्वत विकासाची किती उद्दिष्टे निश्चित केली आहेत ?

(1) 17 (2) 15 (3) 20 (4) 10

As per UN World Agenda 2015, how many sustainable development goals are identified ?

(1) 17 (2) 15 (3) 20 (4) 10

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Adda247 GET IT ON Google Play



19. यमुना नदीच्या उपनद्यांना पूर्व ते पश्चिम अशा क्रमात मांडा.

नद्या - सिंध, चंबळ, बेटवा, केन

(1) सिंध, चंबळ, केन, बेटवा

(2) केन, बेटवा, सिंध, चंबळ

(3) केन, सिंध, बेटवा, चंबळ

(4) केन, चंबळ, बेटवा, सिंध

Arrange these tributaries of Yamuna river from East to West direction.

Rivers – Sindh, Chambal, Betwa, Ken

(1) Sindh, Chambal, Ken, Betwa

(2) Ken, Betwa, Sindh, Chambal

(3) Ken, Sindh, Betwa, Chambal

(4) Ken, Chambal, Betwa, Sindh

---

20. महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण-2025 नुसार महाराष्ट्रातील महामार्गांवर किती अंतरावर इलेक्ट्रीक वाहनांसाठी चार्जींग स्टेशन्स बसवले जातील ?

(1) 25 कि.मी. (2) 40 कि.मी.

(3) 50 कि.मी. (4) 100 कि.मी.

At what distance along highways in Maharashtra will charging stations for electric vehicles be installed as per Maharashtra Electric Vehicle Policy-2025 ?

(1) 25 km (2) 40 km

(3) 50 km (4) 100 km

---

21. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (NPSM) ________ पंचवार्षिक योजनेत तयार करण्यात आले.

(1) नवव्या (2) दहाव्या

(3) अकराव्या (4) बाराव्या

National Food Security Mission (NPSM) formulated in the ________ five year plan.

(1) Ninth (2) Tenth

(3) Eleventh (4) Twelfth

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



Adda247

Adda247 GET IT ON Google Play



22. पुढीलपैकी योग्य विधान ओळखा.

अ. राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन आणि रोजगार पातळी यावरील प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी सरकार ज्या धोरणानुसार आपल्या खर्चविषयक आणि महसूल विषयक कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी करते त्या धोरणास चलन विषयक धोरण म्हणतात.

ब. अर्थव्यवस्थेचे कार्य सुरळीतपणे चालण्याच्या दृष्टीने राजकोषीय धोरणाला 1929-33 च्या महामंदी नंतरच्या काळात अधिक महत्व प्राप्त झाले. त्यामध्ये जे. एम. केन्स यांचे योगदान मोठे आहे.

(1) फक्त अ (2) फक्त ब

(3) दोन्ही योग्य (4) दोन्ही अयोग्य

Identify the correct statement/s from the following.

A. The policy according to which the government plans and implements its expenditure and revenue programs to avoid adverse effects on national income, production and employment levels is called monetary policy.

B. Fiscal policy gained more importance in the post Great Depression period of 1929-33 in terms of smooth functioning of the economy. J. M. Keynes contribution in this regard is significant.

(1) Only A (2) Only B

(3) Both are correct (4) Both are incorrect

23. पुढीलपैकी बरोबर जोडी कोणती ते शोधा ?

(1) चौदावा वित्त आयोग – वाय. व्ही. रेड्डी

(2) दहावी पंचवार्षिक योजना – 2003 – 2008

(3) सीमा शुल्कातील घट – वित्तीय क्षेत्रातील सुधारणा

(4) 2022-23 मधील केंद्र सरकारची वित्तीय तूट – स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या 5.8%

Find out a correct match from the following :

(1) Fourteenth finance commission – Y.V. Reddy

(2) Tenth five year plan – 2003 – 2008

(3) Lowering of customs duties – Financial sector reforms

(4) Fiscal deficit of Central Government for 2022-23 – 5.8% of GDP

Adda247 GET IT ON Google Play



24. खालीलपैकी कोणता पर्याय दिनांक 14-08-2018 पासूनच्या विस्तारित प्रधानमंत्री जनधन योजनेतील तीन प्रमुख सुधारणा योग्यरीत्या दर्शवतो ?

(1) ओव्हरड्राफ्ट (OD) मर्यादा वाढवली, विमा संरक्षण कमी केले, वयोमर्यादा अपरिवर्तित ठेवली

(2) ओव्हरड्राफ्ट (OD) मर्यादा कमी केली, विमा संरक्षण वाढवले, अटी जोडल्या

(3) ओव्हरड्राफ्ट (OD) मर्यादा वाढवली, विमा संरक्षण वाढवले, वयोमर्यादा वाढवली

(4) ओव्हरड्राफ्ट (OD) मर्यादा वाढवली, विमा संरक्षण अपरिवर्तित ठेवले, अटी जोडल्या

Which of the following combinations correctly reflects the three key enhancements under the extended Pradhan Mantri JanDhan Yojana (PMJDY) from 14-08-2018.

(1) Overdraft (OD) limit raised, insurance cover reduced, age limit unchanged

(2) Overdraft (OD) limit lowered, insurance cover raised, conditions added

(3) Overdraft (OD) limit raised, insurance cover raised, age limit raised

(4) Overdraft (OD) limit raised, insurance cover unchanged, conditions added

---

25. 1991 मधे स्थापन झालेली एम. नरसिम्हम् समिती खालीलपैकी कशाशी संबंधित आहे ?

(1) वस्तु बाजारातील सुधारणा (2) रुपयाची परिवर्तनीयता

(3) औद्योगिक आजारपण (4) वित्त विषयक सुधारणा

M. Narasimham Committee formed in 1991 is associated with which of the following ?

(1) Reforms in commodity market (2) Convertibility of rupee

(3) Industrial sickness (4) Financial sector reforms

---

26. सरकारने मे 2016 मध्ये राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्प व्यवस्थापन (FRBM) कायद्याचा आढावा घेण्यासाठी ________ यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची समिती नियुक्त केली.

(1) एल. के. झा (2) एन. के. सिंग

(3) राजा चेलया (4) एम. नरसिम्हम्

The Government appointed a five member Committee headed by ________ in May 2016 to review the Fiscal Responsibility and Budget Management (FRBM) Act.

(1) L. K. Jha (2) N. K. Singh

(3) Raja Chelliah (4) M. Narasimham

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Adda247 GET IT ON Google Play



27. नीती आयोग स्थापना ________ या दिवशी झाली.
(1) 1 जानेवारी 2015
(2) 15 ऑगस्ट 2014
(3) 26 जानेवारी 2015
(4) 1 एप्रिल 2014

NITI Aayog was established on ________.
(1) 1st January 2015
(2) 15th August 2014
(3) 26th January 2015
(4) 1st April 2014

28. दारिद्र्य रेषेच्या व्याख्यांचे स्पष्टीकरण कोणत्या समितीने केले ?
अ. तेंडूलकर समिती
ब. रंगराजन समिती
क. विजय केळकर समिती
ड. आर. एन. मल्होत्रा समिती
(1) फक्त अ
(2) फक्त अ आणि ब
(3) फक्त क
(4) फक्त ड

Which Committee/s explained the definition of poverty line ?
a. Tendulkar Committee
b. Rangarajan Committee
c. Vijay Kelkar Committee
d. R. N. Malhotra Committee
(1) Only a
(2) Only a and b
(3) Only c
(4) Only d

29. भारताच्या औद्योगिक धोरणाबाबत पुढीलपैकी चुकीचे विधान कोणते ?
अ. 1948 च्या औद्योगिक धोरणाने भारतासाठी मिश्र अर्थव्यवस्थेच्या स्थापनेचे उद्दिष्ट स्पष्ट केले.
ब. 1948 च्या औद्योगिक धोरणापेक्षा 1956 च्या औद्योगिक धोरणाने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना व त्यांच्या विकासाला अधिक महत्व दिल्याचे दिसून येते.
क. 1991 च्या धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्रासाठी फक्त 17 उद्योग राखून ठेवले.
(1) फक्त अ
(2) अ आणि ब
(3) फक्त क
(4) वरील सर्व

Which of the following statement regarding India's Industrial Policy is incorrect ?
A. The Industrial Policy of 1948 set out the objective of establishing a mixed economy for India.
B. It is seen that the 1956 Industrial Policy gave more importance to public sector industries and its development than the 1948 Industrial Policy.
C. According to the 1991 policy, only 17 industries were reserved for the public sector.
(1) Only A
(2) A and B
(3) Only C
(4) All of the above

Adda247 GET IT ON Google Play



**30.** राष्ट्रीय लोकसंख्या धोरण 2000 च्या उद्दिष्टात समाविष्ट आहे ______________.

अ. स्थूल प्रजनन दर घटविणे

ब. 2045 पर्यंत लोकसंख्या स्थिर करणे

क. स्त्री-पुरुष (लिंगभाव) समानता आणणे

ड. 2045 पर्यंत 100% नागरीकरण साध्य करणे

(1) फक्त अ आणि ब
(2) फक्त ब आणि ड
(3) फक्त अ आणि क
(4) वरीलपैकी सर्व

The objectives of National Population Policy 2000 includes ______________.

a. To reduce total fertility rate

b. To stabilize population by 2045

c. To bring gender equality

d. To attain 100% urbanization by 2045

(1) Only a and b
(2) Only b and d
(3) Only a and c
(4) All of the above

---

**31.** सार्वजनिक कर्जाच्या स्थिरतेसाठी सामान्यत: स्वीकृत निकष __________ हे आहेत.

अ. विशिष्ट कालावधीत कर्ज शून्य असावे.

ब. भविष्यातील कर्ज - GDP गुणोत्तर आजच्या कर्ज : GDP गुणोत्तराच्या विशिष्ट भागापर्यंत कमी केले पाहिजे.

क. भविष्यासाठी कर्ज - GDP गुणोत्तर आजच्या गुणोत्तरावर निश्चित केले जाऊ शकते.

(1) अ आणि ब
(2) ब आणि क
(3) अ आणि क
(4) अ, ब आणि क

The generally accepted criteria for public debt sustainability are ______________.

a. Debt should be nil during specified period.

b. Future debt-GDP ratio should be reduced to a certain fraction of today's debt-GDP ratio.

c. The debt-GDP ratio for the future can be fixed at today's ratio.

(1) a and b
(2) b and c
(3) a and c
(4) a, b and c

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

Adda247 GET IT ON Google Play



32. अन्नधान्याचे बफर स्टॉक ____________ करिता असतात.

अ. किंमतीतील चढ-उतार मर्यादीत करण्यासाठी

ब. अन्नधान्य निर्यात

क. बियाणे पुरवठा

ड. खुल्या बाजारात विकण्यासाठी

(1) अ (2) अ आणि ड (3) ब (4) क

The buffer stock of foodgrains are for ____________.

a. Moderating price fluctuations

b. Export of foodgrains

c. Seed supply

d. Sale in open market

(1) a (2) a and d (3) b (4) c

33. राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेची (नाबार्ड) स्थापना कधी झाली ?

(1) 1 एप्रिल 1935 (2) 12 जुलै 1982

(3) 2 ऑक्टोबर 1982 (4) 1 मे 1960

When was the National Bank for Agriculture and Rural Development (NABARD) established ?

(1) 1 April 1935 (2) 12 July 1982

(3) 2 October 1982 (4) 1 May 1960

34. आर. बी. आय. च्या कोणत्या कायद्यानुसार शेड्युल्ड बँक आणि नॉन शेड्युल्ड बँक असे वर्गीकरण केले जाते ?

(1) आर. बी. आय. ॲक्ट 1930 (2) आर. बी. आय. ॲक्ट 1934

(3) आर. बी. आय. ॲक्ट 1956 (4) बँकींग नियमन कायदा 1949

Which RBI Act classifies the Scheduled Bank and Non Scheduled Bank ?

(1) RBI Act 1930 (2) RBI Act 1934

(3) RBI Act 1956 (4) Banking Regulation Act 1949

Adda247 GET IT ON Google Play



**35.** लोकसंख्या संक्रमण सिध्दांतातील तिसरा टप्पा कोणता ?

अ. जन्मदर आणि मृत्यूदर दोन्ही जास्त

ब. लोकसंख्येची जलदवाढ

क. मृत्यूदरात लक्षणीय वाढ

ड. जन्मदरात लक्षणीय घट

(1) फक्त अ (2) फक्त अ आणि ब (3) फक्त क (4) फक्त ड

Which is the third stage in the theory of demographic transition ?

a. Both birth rate and death rate remain high

b. Rapid growth of population

c. Death rate increases significantly

d. Birth rate declines significantly

(1) Only a (2) Only a and b (3) Only c (4) Only d

---

**36.** पीएम धन-धान्य कृषी योजना (PMDDKY) बाबत खालीलपैकी योग्य कथन/ने ओळखा.

अ. केंद्रीय मंत्रिमंडळाने 16 जुलै 2025 रोजी PMDDKY योजनेला मंजुरी दिली.

ब. ही योजना 200 कृषी जिल्ह्यांमध्ये विकासाला चालना देण्यासाठी डिझाईन केलेली आहे.

(1) अ आणि ब दोन्हीही (2) फक्त ब

(3) फक्त अ (4) वरीलपैकी नाही

Identify the correct statement/s from the following about – PM Dhan-Dhanya Krishi Yojana (PMDDKY).

A. On 16th July 2025, the Union Cabinet approved the PMDDKY.

B. This scheme is designed to catalyse growth in 200 agri-districts.

(1) Both A and B (2) Only B

(3) Only A (4) None of the above

---

**37.** सामाजिक विकासासाठी दुसरी जागतिक शिखर परिषद 2025 ही 4 ते 6 नोव्हेंबर 2025 दरम्यान ________ येथे झाली.

(1) दोहा, कतार (2) जिनेव्हा, स्वित्झरलँड

(3) दिल्ली, भारत (4) कराची, पाकिस्तान

The Second World Summit for Social Development 2025 was held in ________ from 4 to 6 November, 2025.

(1) Doha, Qatar (2) Geneva, Switzerland

(3) Delhi, India (4) Karachi, Pakistan

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

Adda247 GET IT ON Google Play



38. खालीलपैकी कोणत्या क्रीडापटूंना 2025 मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले ?

अ. रवि अश्विन

ब. हरविंदर सिंह

क. आय. एम. विजयन

ड. पी. आर. श्रीजेश

(1) फक्त अ, ब, क (2) फक्त ब, क, ड

(3) फक्त अ, ब, ड (4) वरीलपैकी सर्व

Which of the following sportsmen were honoured with Padma Shri Award in 2025 ?

A. Ravi Ashwin

B. Harvinder Singh

C. I. M. Vijayan

D. P. R. Sreejesh

(1) Only A, B, C (2) Only B, C, D

(3) Only A, B, D (4) All of the above

---

39. निवडणूक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाद्वारे खालीलपैकी कोणते एक एकीकृत डिजीटल प्लॅटफॉर्म आहे ?

(1) इलेक्ट ॲप (2) ई.सी.आय. नेट

(3) डी.आय.जी.ई.एल.सी. (4) ई.सी.आय. ईझी

Which of the following is a unified digital platform by the Election Commission of India to simplify the electoral processes ?

(1) ELECT APP (2) ECI NET

(3) DIGELC (4) ECI EASY

---

40. राष्ट्रीय प्रगतीतील महत्त्वपूर्ण योगदानासाठी 43 व्या लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने कोणाला सन्मानित करण्यात आले ?

(1) श्री. देवेंद्र फडणवीस (2) श्री. एकनाथ शिंदे

(3) श्री. नितीन गडकरी (4) श्री. अजित पवार

Who was honoured with the 43rd Lokmanya Tilak National Award for significant contribution to National Progress ?

(1) Shri. Devendra Fadnavis (2) Shri. Eknath Shinde

(3) Shri. Nitin Gadkari (4) Shri. Ajit Pawar

---

Adda247 GET IT ON Google Play



**41.** 2025 च्या ड्युरँड कपमध्ये कोणता संघ उपविजेता ठरला ?

(1) नॉर्थ ईस्ट युनायटेड फुटबॉल क्लब (2) डायमंड हार्बर फुटबॉल क्लब

(3) मोहन बागान फुटबॉल क्लब (4) केरला ब्लास्टर्स फुटबॉल क्लब

Which team was the runner-up of the Durand Cup 2025 ?

(1) North East United Football Club (2) Diamond Harbour Football Club

(3) Mohan Bagan Football Club (4) Kerala Blasters Football Club

**42.** कोणत्या शहरात 11 वी एसिआन संरक्षण मंत्र्यांची बैठक-प्लस पार पडली ?

(1) बँकॉक (2) बर्मा

(3) सिंगापूर (4) व्हिएनतियान

In which city the 11$^{th}$ ASEAN Defence Minister's Meeting-Plus was held ?

(1) Bangkok (2) Burma

(3) Singapore (4) Vientiane

**43.** अजिंठा-वेरूळ चित्रपट महोत्सवात पद्मपाणी जीवन गौरव पुरस्काराने खालीलपैकी कोणाला सन्मानित करण्यात आले ?

(1) महेश कोठारे (2) अशोक सराफ

(3) सई परांजपे (4) सचिन पिळगांवकर

Who among the following was honoured with Padmapani Lifetime Achievement Award at Ajanta-Ellora Film Festival ?

(1) Mahesh Kothare (2) Ashok Saraf

(3) Sai Paranjape (4) Sachin Pilgoankar

**44.** 1985 मध्ये विद्यापिठाच्या स्थापनेपासून इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापिठाच्या पहिल्या महिला कुलगुरु म्हणून कोणाची नियुक्ती करण्यात आली आहे ?

(1) प्रा. उमा कांजीलाल (2) प्रा. उज्ज्वला चक्रदेव

(3) डॉ. सुजाता शाही (4) प्रा. संगिता शुक्ला

Who has been appointed as the first woman Vice Chancellor of Indira Gandhi National Open University since the university's founding in 1985 ?

(1) Prof. Uma Kanjilal (2) Prof. Ujwala Chakradeo

